# प्रेसनोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०८/०६/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १) श्री.रामलाल बिसराम भिलावेकर, वय ४५ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद —ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) (वर्ग ३), ग्रामपंचायत दिया ता.धारणी, जि. अमरावती, राह. —चिचघाट ता.धारणी, जि. अमरावती |
| ३ | अपराध घडला दिनांक व वेळ | दिनांक ०८/०६/२०२६ रोजी १५.०८ ते १६.०४ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | २,०००/—रुपये |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | २,०००—रुपये |
| ६ | घटनास्थळ | आलोसे यांचे भाडयाचे खाजगी कार्यालय,सिव्हील लाईन,धारणी |

**थोडक्यात हकिगत** :— यातील तक्रारदार यांना कडधान्य विक्रिकरीता गोडावुन बांधण्याकरीता लागणारे ग्रामपंचायतचे नाहरकरत प्रमाणपत्र देण्यासाठी लोकसेवक श्री.रामलाल बिसराम भिलावेकर, —ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) यांनी २,०००/— रूपये लाच रक्कमेची मागणी केलेबाबत तक्रारदार यांनी दिनांक ०८/०६/२०२६ रोजी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०८/०६/२०२६ रोजीचे शासकिय पंचासमक्ष पडताळणीमध्ये आलोसे श्री. रामलाल भिलावेकर , ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) यांनी तक्रारदार यांना कडधान्य विक्रिकरीता गोडावुन बांधण्याकरीता लागणारे ग्रामपंचायतचे नाहरकरत प्रमाणपत्र देण्यासाठी २,०००/—रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याची समंती दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक ०८/०६/२०२६ रोजी शासकिय पंचासमक्ष आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे श्री.रामलाल भिलावेकर,ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) यांनी लाच रक्कम २,०००/—रू. पंचासमक्ष भाडयाचे खाजगी कार्यालय,सिव्हील लाईन,धारणी येथे स्विकारले, त्याच वेळेला पथकाने श्री रामलाल भिलावेकर यांना त्यांचे खाजगी कार्यालयातुन लाच रकमेसह ताब्यात घेतले आहे. वरून आरोपी लोकसेवक श्री रामलाल भिलावेकर यांचेवर पो.स्टे.धारणी, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली,पर्यवेक्षण अधिकारी श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, सापळा अधिकारी श्री.रमेश ताले, पोलीस उपअधिक्षक,पोनी चित्रा मेसरे ,पोलीस अंमलदार वैभव जायले, राजेश मेटकर ,सुधीर चर्जन चालक पोउपनि श्री. सतिश किटुकले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क: १)मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र**
**मो.क्र.९०११३२३४२६**
**२)श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र**
**मो.क्र.९७६४२१०४८५**
**३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती**
**मो.क्र.९८२३१११५५,७५१७५७१०६४**
**अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१—२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१, टोल फ्रि नंबर—१०६४**

**(रमेश ताले)**
**पोलीस उपअधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती**

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय
सत्यमेव जयते
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती